

# सहकार हेच जीवन अन् जीवन हेच सहकार

'आपले जीवन सहकारमय आहे. सहकार जोपासणे, वाढविणे, मोठा करणे आणि जतन करणे यातच खरी शांती आहे, थोडक्यात, सहकार हेच जीवन अन् जीवन हेच सहकार नव्हे काय?'

प्रत्येक जीवनाची सुरूवात ही कोणत्याही दोन जीवांच्या सहकार्याने वंशवल्ली वाढविण्याच्या उद्देशाने होत असते. जीवनाची सुरुवात पती-पत्नीच्या सहकार्याने स्वतःचे जीवन सफल करण्याच्या उद्देशानेच होत असते, म्हणजे भारतातील सहकाराची चळवळ पुणे आणि अहमदनगरच्या शेतकऱ्यांनी सावकारी विरुद्ध १९७९ मध्ये सुरू केली असली तरी वास्तविक ती जगाच्या सुरुवातीपासून अस्तित्वात आहे.

निसर्गात वेगवेगळे जीव आहेत. झाडे-झुडपे हे सूर्यप्रकाश, पाणी, मातीतील क्षार व हवेतील कार्बन-डाय-ऑक्साईड व प्राणवायूंनी आपले जीवन विकसित करीत असतात शाकाहारी प्राणी वनस्पतींवर जगतात तर मांसाहारी प्राणी इतर प्राण्यांवर आणि मिश्राहारी हे वनस्पती व मांस भक्षण करतात. प्राण्यांचे, वनस्पतींचे जीवन समाप्त झाल्यावर त्यातील सर्व घटक पुन्हा निसर्गात विलीन होत असतात. यातूनच आपल्या लक्षात येईल की, संपूर्ण जीवनचक्र सहकार्य व सहकारानेच चालत आहे आणि चालत राहणार यात शंका नाही. पृथ्वीभोवती फिरणारा चंद्र, सूर्याभोवती फिरणारे नवग्रह व त्यामुळे संपूर्ण विश्व हे देखील उदात्त सहकाराचेच सुंदर उदाहरण नव्हे काय?

मानवाच्या जन्मानंतर तो आई-वडिलांच्या सहकार्याने वाढतो, मित्रमंडळींच्या सहकार्याने विचारधारा वाढवितो. अशारीतीने जीवनाच्या प्रत्येक क्षणी समाजशील असा हा मानव सहकारानेच जागृत असतो. एवढेच काय पण मेल्यानंतर देखील अंत्यसंस्कारांपर्यंत दुसऱ्याचेच सहकार्य लागत असते. मानवाच्या शरीरात देखील सर्व अवयव सहकार्यानेच चालत असतात. नयन पाहतात, कर्ण श्रवण करतात, पाय चालतात इत्यादी हे सर्वच एका उद्देशाने काम करीत असतात. म्हणजेच थोडक्यात सहकाराची व्याख्या एका ठराविक उद्देशासाठी झालेले निरनिराळे सहकार्य होय. अशा या विश्वव्यापी सहकाराला वाढविले पाहिजे, जोपासले पाहिजे, मोठे केले पाहिजे. ज्यावेळेस आपले नयन एक पाहतील, कर्ण दुसरेच ऐकेल व पाय तिसरीकडेच चालतील त्यावेळेस त्या अवयवांतील सहकार संपला असेल म्हणजेच त्या माणसाच्या जीवनाचे उद्देश संपले असतील व तो जरी जिवंत असला, तरी त्याचे खरे जीवन मात्र अस्तित्वात असणार नाही.

त्याप्रमाणे ही संपूर्ण जीवनसृष्टी वनस्पती व प्राणी यांच्या सहकार्यानेच चालली आहे. वनस्पतींच्या व प्राण्यांच्या मानवाने केलेल्या नाशामुळेच आजचे संपूर्ण पर्यावरण ढासळत आहे. त्यामुळे होत असलेले गंभीर परिणाम एक दिवस अखेरच्या विनाशाकडे नेतील. त्यासाठी पुन्हा एकदा सहकार्याने निसर्गातील वनस्पती व प्राणीसृष्टी वाचविली पाहिजे. प्रदूषण थांबविले पाहिजे. मानवाने हे लक्षात ठेवले पाहिजे की केवळ फक्त त्यांच्या अस्तित्वाने तो कधीच जगू शकणार नाही त्याला इतर जीवसृष्टीच्या सहकार्याची गरज आहे.

आज भारत देशात अनेक राज्ये आहेत, अनेक धर्माची, विचारांची माणसे आहेत, त्यामुळे भारतातील जनतेचे कल्याण देखील आपआपसातील सहकार्यानेच होणार आहे. इतकेच काय परंतु संपूर्ण आंतरराष्ट्रीय जीवनात देखील सहकार पाहिजे, नाहीतर तिसऱ्या महायुद्धाचे तडाखे आता या पृथ्वीस वाचवू शकणार नाहीत.

सर्वात शेवटी आपले जीवन हे सहकारमय आहे, सहकाराला बदनामीपासून वाचविणे हे सर्वांचेच आद्य कर्तव्य आहे. सहकार जोपासणे, वाढविणे, मोठा करणे, अन् जतन करणे यातच खरी शांती आहे. थोडक्यात, सहकार हेच जीवन अन् जीवन हेच सहकार नव्हे काय?

१९९२ पासून केंद्र शासनाच्या मुक्त आर्थिक धोरणाअंतर्गत दूध क्षेत्रात मोठ्या

प्रमाणात खाजगीकरणाचे वारे वाहताना दिसतात. आज पुण्यासारख्या शहरामध्ये ८५ प्रकारच्या दुधाचे ब्रँण्ड्स ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत. त्यातच खाजगी दूध पुरवठा करणाऱ्या संस्था या आपल्या जाहिरात माध्यमातून ग्राहक व उत्पादक वर्गाला आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहे. यातच सहकाराअंतर्गत होणारी स्पर्धा म्हणजे दूध महासंघ विरुद्ध जिल्हा संघ, जिल्हासंघ विरुद्ध इतर जिल्हा संघ व तालुका संघ तसेच शासन आणि वेगवेगळे खाजगी दूध प्रकल्प यामुळे आज दूध उत्पादकांचा सर्वांगीण विकास न होता फक्त दुधाच्या दराभोवती राजकारण फिरत आहे. ज्याप्रमाणे महाभारतातील कुरुक्षेत्रावर रणधुमाळी माजली होती आणि दूध उत्पादकरूपी अर्जुनाला त्याच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी सहकारी संस्थारूपी श्रीकृष्णाने केवळ त्या दूध उत्पादकाचा संपूर्ण विकास हाच केंद्रबिंदू मानून केला पाहिजे असे मला स्पष्टपणे वाटते.

गुजरात मिल्क मार्केटिंग फेडरेशनप्रमाणे सर्व जिल्हा संघाची मिळून एक शिखर संस्था व त्यांचा एकच अमूल नावाचा ब्रॅण्ड याप्रमाणे महाराष्ट्रात दिसत नाही. तसेच या सर्व राज्यांच्या फेडरेशनची शिखर संस्था जिचे नाव नॅशनल को-ऑप. डेअरी फेडरेशन ऑफ इंडिया (NCDFI) यांचाही एक ब्रॅण्ड हा निर्माण होण्याची गरज आहे.

एका बाजूला शासन स्तरावरती काही योजना राबविण्यासाठी पैसा उपलब्ध नाही असे चित्र भासविले जाते मात्र प्रत्यक्षात वेगळेच असते. एखाद्या खाजगी सहकारी क्षेत्रात गरजेपेक्षा अधिक गुंतवणूक होऊन सदरचे क्षेत्र जोमाने चालवण्याऐवजी आजारी पडण्याकडेच त्याचा कल होतो हीच परिस्थिती साखर कारखान्याबरोबर दूध डेअरी यांचीही दिसून येते. पुणे जिल्ह्याचा विचार करता पुणे जिल्ह्यात उत्पादित होणाऱ्या दुधाच्या तिप्पट क्षमतेचे शासकीय, खाजगी प्लॅण्टस उभे आहेत. तसेच अजूनही नवीन प्लॅण्ट सुरू होण्याचे मार्गावर आहेत.

जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ डार्विनच्या सिद्धांताप्रमाणे 'जगेल तो पुढे जाईल' या नुसार एखादे खाजगी सहकारी क्षेत्र यातून जगून पुढे जाईल. कदाचित एखादे क्षेत्र कायमचेच बंद होईल. परंतु, कोण जगेल आणि कोण वाचेल यापेक्षाही सर्वसामान्य माणसांचाच पैसा यात नष्ट होणार आहे हे तेवढेच पक्के, कारण शासन म्हटले तरी सर्वसामान्यांच्या गोळा केलेल्या टॅक्समधूनच या योजना उभ्या राहतात. खाजगी म्हटले तरी सर्वसामान्य लोकांचा पैसा गुंतलेला असतो.

सहकार हेच जीवन असून जीवन हाच सहकार आहे. उद्या भविष्यात दूध संकलनाची व वितरणाची संपूर्ण जबाबदारी ही सहकारने पेलावी व अत्याधुनिक दुग्धजन्य पदार्थाची निर्मिती ही खाजगी क्षेत्रामार्फत करून दोन्हींवर शासनाने नियंत्रण ठेवून नफ्याची वाटणी जास्तीत जास्त दूध उत्पादकांना मिळेल हे पाहावे. व त्याचबरोबर दूध उत्पादनाचा खर्च कमी करण्याच्या दृष्टीने शासकीय योजना मग त्या जिल्हा परिषद कृषी खाते, पशुसंवर्धन खाते, सहकार खाते इत्यादींमार्फत राबविल्या जाणाऱ्या असोत त्यांच्यातही एकवाक्यता आणावी दूध उत्पादन हे किफायतशीर होण्याची तसेच त्यात वेगवेगळ्या संशोधनाची व आधुनिकीकरणाची गरज आहे.

त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकाला चांगल्या दर्जाचे दूध मिळेल व सहकारात क्रांती घडून येईल. दूध ग्राहक हा सहकार चळवळीत अभेद्य राहिला जाईल.

दुधातील सहकार हा साखरेतील सहकारापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे; कारण दूध उत्पादक आणि दूध ग्राहकांची नाळ या माध्यमाने जोडली आहे. साखर कारखान्यांच्या बाबत मात्र उत्पादित केलेली साखर ही व्यापाऱ्यांच्या मार्फत ग्राहकांना वितरीत होत असते.

आज बाजारात अनेक प्रकारचे दुधाचे ब्रॅण्ड जरी विक्रिसाठी आलेले असले तरी काही ठराविक दुधाच्या ब्रॅण्डची गुणवत्ता, दर्जा कायमस्वरूपी दिसून येत आहे. त्यामुळे शासनाचा सहकारावर व खाजगीवर दोन्हींवर अंकुश असणे आवश्यक आहे. सध्यातरी खाजगी दूध उद्योग क्षेत्रावर कोणाचाही अंकुश असलेला दिसत नाही.

शासनाने दूध धंद्याबाबत एक स्वतंत्र प्रणाली तयार करून त्या प्रणालीची अंमलबजावणी सहकाराप्रमाणे खाजगी उद्योगांनी राबविणे सक्तीचे केल्यास यातील अनावश्यक बाबींची कमी होऊन शेतकऱ्यांना चांगल्या दुधास चांगला दर मिळेल व ग्राहकांना देखील चांगल्या दर्जाचे दूध प्राप्त होईल. अशामुळे सहकार बळकट होईल व आर्थिक व शारीरिक बलवान भारत निर्मितीचे स्वप्न दूध धंद्यातून उदयास येईल.